झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड,
पुणे - १६
जा. क्र. झोपुप्रा/तांत्रिक कअ १/झोपुआ/प्र.क्र.२६/१० - १००८
दिनांक - ६/०८/१०

## ''झोपडपट्टी पुनर्वसन आदेश''

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो. - २००४ / प्र. क्र. - २१३ / झो. प. सु. - १ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतूदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजूरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ४ (१) मधील तरतुदीनुसार खालील अनुसुचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे सक्षम प्राधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी गलिच्छ वस्ती / झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर जमिनीच्या मालकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक नमन डेव्हलपर्स यांना विकसनाचे हक्क दिलेले आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी तथा उपायुक्त विभाग क्र. १ पुणे महानगरपालिका यांनी झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. सदरच्या जमिनीवर एकूण १५२ झोपड्या असून त्यापैकी १२१ निवासी आणि ६ बिगर निवासी झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरलेले आहेत. तसेच १९ निवासी व १ बिगर निवासी अपात्र आहेत. या व्यतिरिक्त मिळकत क्षेत्रामध्ये इतर बांधकामे पाच आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी ७०% पेक्षा जास्त झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसकास संमती दिलेली आहे. त्याअर्थी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

Scanned with CamScanner

त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचीत नमुद केलेले क्षेत्र हे "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिद्ध झाल्यापासून चार आठवड्यांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल. आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

**भांबुर्डा, शिवाजीनगर, टी.पी.स्कीम १ पुणे**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| सि.स.नं.१२१६/४, फा.प्लॉ.क्र.५७६/४ | ८०२.८१७ चौ.मी (९९५.५२ चौ.मी.पै. फर्ग्युसन रोड कडील रस्तारुंदी क्षेत्र वजा जाता उर्वरित क्षेत्र) | पुर्व - फा.प्लॉ.नं.५७६/९<br>दक्षिण - फा.प्लॉ.नं.५७६/५<br>पश्चिम - लागु फर्ग्युसन रस्ता<br>उत्तर - लागु रस्ता |
| सि.स.नं.१२१६, फा.प्लॉ.क्र.५७६/५ | ९८३.८२ चौ.मी (११३९.१९ चौ.मी.पै. फर्ग्युसन रोड कडील रस्तारुंदी क्षेत्र वजा जाता उर्वरित क्षेत्र) | पुर्व - फा.प्लॉ.नं.५७६/८ व ९पै.<br>दक्षिण - फा.प्लॉ.नं.५७६/६व ७पै.<br>पश्चिम - फर्ग्युसन रस्ता<br>उत्तर - रस्ता व फा.प्लॉ.नं.५७६/४ |
| सि.स.नं.१२१६/९, फा.प्लॉ.क्र.५७६/९ | ९३८.८७ चौ.मी | पुर्व - लागु रस्ता<br>दक्षिण - लागु फा.प्लॉ.नं.५७६/८<br>पश्चिम - फा.प्लॉ.नं.५७६/४ व ५<br>उत्तर - लागु रस्ता |
| सि.स.नं.१२१६/१० फा.प्लॉ.क्र.५७६/१० | १११३ चौ.मी. | पुर्व - फा.प्लॉ.नं.५७५ पै.<br>दक्षिण - फा.प्लॉ.नं.५७६/११<br>पश्चिम - लागु रस्ता<br>उत्तर - फा.प्लॉ.नं.५७६/३ |

एकूण घोषित करावयाचे पुनर्वसन क्षेत्र ३८३८.५०७ चौ.मी.

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी देण्यात आला.

"सत्यप्रत"

सहाय्यक अभियंता क्र.
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र
पुणे-१६.

(महेश झगडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे .

Scanned with CamScanner